**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी

* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४९ वा | सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ‘मुंबईला जाण्यापासून रोखण्याचे स्वप्न पाहू नका’



## मनोज जरांगेंचा सरकारला इशारा, सलाइन-पाणीही बंद

**अंतरवली सराटी (कटूसत्य वृत्त):-** मंत्र्यांचे शिष्टमंडळ चर्चेला आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून हैदराबाद गॅझेटियरप्रमाणे वैधता प्रमाणपत्र देऊ, असे सांगून गेले. पण, अद्याप त्याला सुरुवात झाली नाही. शिवाय ५८ लाख नोंदी गावागावांत करून शिबिरेही सुरू झाली नाहीत.

त्यामुळे हे मंत्रिमंडळाचे शिष्टमंडळ छत्रपती संभाजीनगरात मागील तीन दिवसांपासून आंदोलन मोडीत काढण्याचा डाव साधत आहे का?", असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

शनिवारी माध्यमांशी बोलताना जरांगे म्हणाले, "यावेळी मराठा समाजातील कोणालाही काठी लावली तर सरकारला जड जाईल. मुंबईला जाण्यापासून रोखण्याचे स्वप्न पाहू नका. बॅरिकेड लावून थांबणार नाही. आम्हाला ओबीसीचे आरक्षण नको, पण जे आमचे आहे, ते द्या. मंत्र्यांकडून छत्रपती संभाजीनगरमध्ये वेळखाऊपणा केला जात आहे. तुम्ही इथे सरकारच्या शिफारशी करण्यासाठी येतात का? शरद पवार, महाविकास आघाडीने काहीच केले नाही, मुख्यमंत्री फडणवीसांनी मराठा समाजासाठी खूप केले, हे सांगण्यासाठी येता का? तुम्ही देऊनही प्रमाणपत्र रद्द करत आहात.

सातारा, कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याचा मुद्दा प्रलंबित असून त्याचा निर्णय दिला नाही."मराठा आरक्षणविषयक उपसमितीला खमक्या माणूस लागतो, अशी टीका जरांगेंनी विखे पाटील यांच्यावर नाव न घेता केली. १९९४ चा शासन निर्णय, मंडल आयोग देखील अध्यादेशावर आहे, या दोन्हींना आव्हान द्या. अध्यादेशावर एवढे मोठ आरक्षण जिवंत राहू शकत नाही, असे जरांगे यांनी म्हटले.

**सलाइन-पाणी बंद :** मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलनातून माघार घेणार नाही. 'माझे प्रश्न मार्गी लागेपर्यंत तुमचे सलाइन नको आणि पाणी नको. मी शुक्रवारी सकाळी ११ पासून सलाइन, पाणी बंद केले असून, सरकारला राज्य स्थिर राहू द्यायचे नाही, अशी टीका जरांगेंनी केली.

**'श्रेयवादात आरक्षण, गॅझेट अडकले' :** "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणबी प्रमाणपत्र दिल्याने हिरो झाले. पण, मंत्री संजय शिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केले. शिंदेंनी लाडकी बहीण योजना आणलेली देवेंद्र फडणवीसांना खपले नाही. त्यांनी लाडकी दीदी आणली. सरकारमध्ये यांचा श्रेयवाद सुरू आहे. त्यात मराठा आरक्षण आणि गॅझेटियरचा विषय अडकला आहे," असे जरांगेंनी सांगितले.

# संपन्न समाज घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर - प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ‘आजच्या काळात शिक्षकांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. या आव्हानांना सामोरे जात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता सामाजिक भान, संस्कार आणि जबाबदारीची जाणीव देणे आवश्यक आहे. उच्च पदांवर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांची कोणत्याही परिस्थितीत समाजाशी नाळ जोडलेली राहील, असे संस्कार शिक्षकांनी करावेत. त्यातूनच संपन्न आणि संवेदनशील समाजाची निर्मिती होईल,’ असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक तथा माजी प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे यांनी केले.

बसवेश्वर विचार मंचच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि उपक्रमशील शाळा पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. बलिदान चौक येथील जैन स्थानकात परमपूज्य अक्षयश्रीजी, मल्लीश्रीजी, विभवश्रीजी व संयमश्रीजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात हा समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्थायी समिती सभापती सौ. रंजिता चाकोते, डॉ. संध्या रघोजी, मनीषा पाटील, सौ. निर्मला भोसले, जैन स्थानकवासी संघाचे अध्यक्ष पदम राका, ट्रस्टी गौतमचंद संचेती आदी मान्यवर उपस्थित होते.

### बसवेश्वर विचार मंचच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण



### शिक्षकांचा सन्मान

समारंभात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्रा. प्रशांत शिंपी, सौ. संगीता पाटील, सौ. लता सूर्यवंशी-कांबळे, संतोषी जाधव, पल्लवी दोड्डी, सौ. पुनम कटकधोंड, सौ. योगिता पवार, सुजाता खेडगीकर, सौ. गौरी देशमुखे-उपासे, बाबागौडा बिराजदार, उमेश युवनाती, कृष्णकांत उपाध्ये, विरेश थळंगे, सुषमा वाघमोडे, भाऊसाहेब भोसले, सौ. शीला हावळे, सौ. व्ही. आर. गवळी, नौशाद सोफी, चंद्रकांत आदलिंगे, प्रा. प्रसन्न नाझरे, खाशेराव ढोले, प्रमोद कुनगुलवार, डॉ. अंजली शिरसी यांचा समावेश होता.

तसेच शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल सलीम पटेल आणि सचिन सोनवणे या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

### पाच शाळांचा गौरव

याच कार्यक्रमात विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शाळांचाही ‘उपक्रमशील शाळा पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. लोकमंगल माध्यमिक प्रशाला, श्री सिद्धेश्वर कन्या प्रशाला, गांधीनाथा रंगजी मराठी प्राथमिक विभाग, श्री वीर तपस्वी बालक मंदिर मराठी प्राथमिक शाळा, भवानी पेठ आणि चांदतारा उर्दू प्रायमरी स्कूल यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

### विद्यार्थ्यांना स्वप्न दाखवून ते पूर्ण करण्याची ताकद द्या

यावेळी बोलताना सौ. रंजिता चाकोते म्हणाल्या, ह्यशिक्षकांनी समर्पणाच्या भावनेने ज्ञानदानाचे कार्य करावे. आजचा विद्यार्थी कोणत्या दिशेने जात आहे, त्याच्या बदलत्या मानसिकतेचा आणि आव्हानांचा शिक्षकांनी सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. सध्याच्या काळात शिक्षकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झाली आहे. विद्यार्थ्यांना केवळ स्वप्ने दाखवून चालणार नाही, तर ती स्वप्ने प्रत्यक्षात साकार करण्याची क्षमता आणि आत्मविश्वासही विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला पाहिजे.’

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी अभ्यासक्रमासोबतच मूल्यशिक्षण, सामाजिक बांधिलकी, शिस्त आणि कर्तव्याची जाणीव रुजवावी, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी गौतमचंद संचेती यांनी प्रास्ताविकातून बसवेश्वर विचार मंचच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय खंडेराव यांनी केले. सौ. इंदू किणगी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मल्लेश पुरवंत, शैलजा पुरवंत, नागेश्वरी भागानगरे आणि सुचित्रा नागलीकर यांनी परिश्रम घेतले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची यंत्रणा सज्ज

## विसर्जन घाट व मिरवणूक मार्गाची पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील गणेशोत्सव निर्विघ्न, शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी महापालिका प्रशासनाकडून व्यापक नियोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात गणेशोत्सवाच्या तयारीबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीनंतर महापौर विनायक कोंड्याल यांच्या समवेत महापालिका अधिकारी, पोलिस प्रशासन, महावितरणचे अधिकारी आणि मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध विसर्जन घाट तसेच गणेशोत्सव मिरवणूक मार्गाचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला.

या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता ताई चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, पोलीस उपायुक्त प्रीतम येवलेकर, सहाय्यक अभियंता सुनीता इभारे, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वेदांत बॉम्बे, एन. टी. मुजावर, पी. डी. राठोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

तसेच सिद्धेश्वर देवस्थानचे ट्रस्टी शिवकुमार पाटील, मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, पद्माकर नाना काळे, सुनील रसाळे यांच्यासह विविध मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळांचे ट्रस्टी व पदाधिकारी उपस्थित होते.

### महापौरांच्या समवेत विसर्जन घाटांची पाहणी

बैठकीनंतर महापौर विनायक कोंड्याल यांच्या समवेत संबंधित अधिकारी व गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी गणपती घाट, विष्णू घाट, धर्मवीर संभाजी तलाव आणि कंबर तलाव येथील विसर्जन कुंडांची पाहणी केली.



गणेश विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात भाविक व गणेश मंडळे या ठिकाणी येणार असल्याने विसर्जन कुंडांची व्यवस्था, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, सुरक्षितता, पाणी, वाहतूक नियोजन तसेच नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत यावेळी प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

मिरवणूक मार्गावरील अडथळे तातडीने दूर करण्याच्या सूचना

त्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांच्या समवेत गणेशोत्सव मिरवणुकीच्या प्रमुख मार्गाचीही पाहणी करण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गावर असलेले केबलचे वायर्स, झाडांच्या फांद्या, रस्त्यावरील खड्डे, ट्रिमिंग लाईन, पाण्याच्या पाइपलाईन तसेच इतर अडथळे व तांत्रिक समस्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

मिरवणुकीदरम्यान गणेश मंडळांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मिरवणूक मार्गावरील सर्व अडथळे गणेशोत्सवापूर्वीच दूर करण्याचे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, धोकादायक व अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, लोंबकळणाऱ्या केबल वायर्सची योग्य व्यवस्था करणे, पाइपलाईनमुळे निर्माण झालेले अडथळे दूर करणे आदी कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### विभागीय स्तरावरही समन्वय बैठका

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रत्येक विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात गणेशोत्सव मंडळे, संबंधित मध्यवर्ती महामंडळ, महावितरण आणि पोलिस प्रशासनाच्या समन्वयाने बैठका घेण्यात येणार आहेत. या बैठकांमध्ये गणेश मंडळांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

यावेळी लोकमान्य संयुक्त मध्यवर्ती महामंडळाचे बाळासाहेब गायकवाड, लष्कर मध्यवर्ती महामंडळाचे सिद्राम चोपडे, पूर्व विभाग मध्यवर्ती महामंडळाचे संजय साळुंखे, विजापूर रोड मध्यवर्ती महामंडळाचे विश्वनाथ कोळी, विडी घरकुल मध्यवर्ती महामंडळाचे वासुदेव लोखंडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच नर्सिंग में जी. अशोक कलशेट्टी, गौरीशंकर जग्गापुरे, मल्लिनाथ याळगी, विजय पुकाळे, बी.एम.डी. म्हटले, गडदे, सागर पुकाळे, विश्वनाथ आमने, उमा डेंगळे, अनिल गवळी, लता फुटाणे, हेमा चिंचोळकर, नागेश मैत्री, श्रीकांत गाडगे, सचिन स्वामी आदी उपस्थित होते.

‘गणेशोत्सव हा सोलापूर शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक एकतेचा उत्सव आहे. गणेश मंडळे, भाविक आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेत सर्व तयारी पूर्ण करावी. मिरवणूक मार्ग व विसर्जन स्थळांवरील समस्या प्रत्यक्ष पाहणी करून गणेशोत्सवापूर्वीच दूर करण्यात याव्यात. महापालिका, पोलिस प्रशासन, महावितरण आणि गणेशोत्सव मंडळांनी समन्वयाने काम करून उत्सव शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पाडावा,ह्व असे आवाहन महापौर श्री. विनायक कोंड्याल यांनी केले.

# दोन-पाच गुंठे जमीनही आता खरेदी करता येणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महसूल विभागाने जमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी निश्चित केलेल्या प्रमाणभूत क्षेत्राच्या मर्यादेमुळे शेतकऱ्यांना काही गुंठे जमीन खरेदी करताना अडचणी येतात. मात्र, घरकूल बांधकाम, शेतीसाठी रस्ता आणि विहीर खोदण्यासाठी प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी जमीन खरेदी करण्याची तरतूद उपलब्ध आहे. यासाठी संबंधित शेतकऱ्याला आवश्यक कागदपत्रांसह प्रांताधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागतो. जागेची पडताळणी व मंडलाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर साधारणतः ३० दिवसांत परवानगी दिली जाते.

महसूल विभागाच्या नियमानुसार बागायती क्षेत्रासाठी किमान १० गुंठे, तर जिरायती क्षेत्रासाठी २० गुंठे जमीन खरेदी-विक्रीची मर्यादा आहे. त्यामुळे घर बांधण्यासाठी, सिंचनासाठी विहीर खोदण्यासाठी किंवा शेतात जाण्यासाठी रस्ता करण्यासाठी दोन-पाच गुंठे जमीन आवश्यक असलेल्या शेतकऱ्यांना स्वतंत्र परवानगी घ्यावी लागते.

कमी क्षेत्राच्या खरेदीसाठी सक्षम प्राधिकरण म्हणून जिल्हाधिकारी किंवा प्रांताधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक आहे. प्रांताधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यानंतर मंडलाधिकाऱ्यांमार्फत संबंधित जागेची पाहणी करून पंचनामा केला जातो. त्यानंतर अहवालाच्या आधारे खरेदीची परवानगी देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते.

परवानगीच्या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रांत कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागतात. त्यामुळे वेळ आणि पैसा खर्च होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. यामुळे काही ठिकाणी शेतकऱ्यांनी जमीन खरेदी-विक्रीचा कायदेशीर व्यवहार न करता ५०० किंवा १०० रुपयांच्या बॉण्डवर काही गुंठे जमीन घेऊन विहिरी खोदल्याची प्रकरणेही समोर येत आहेत. अशा व्यवहारांमुळे भविष्यात मालकी हक्काबाबत वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कमी क्षेत्राच्या खरेदीसाठी तहसीलदार स्तरावरच परवानगी देण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

### रस्त्यासाठी काय आवश्यक?

शेतीसाठी रस्ता काढण्यासाठी ज्या शेतातून रस्ता जाणार आहे, ती जमीन रस्त्यालगत असणे आवश्यक आहे. संबंधित जमीनमालकाची संमती घेऊन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा लागतो.

### विहिरीसाठी दोन-तीन गुंठे जमीन

विहीर खोदण्यासाठी दोन-तीन गुंठे जमीन खरेदी करायची असल्यास भूजल सर्वेक्षण विभागाची (GSD) परवानगी आवश्यक आहे. तसेच विहिरीसाठी जमीन खरेदी करणाऱ्या शेतकऱ्याच्या नावावर किमान १० गुंठे जमीन असणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

घरकूल बांधण्यासाठी काही गुंठे जमीन खरेदी करायची असल्यास नगररचना विभागाचा (ADTP) दाखला आवश्यक (पान 2 वर..)

# आपत्कालीन भारनियमनाने नागरिकांना त्रास नको; पूर्वसूचना द्या

## पालकमंत्री गोरे यांचे महावितरणला निर्देश

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात सुरू असलेल्या आपत्कालीन विद्युत भारनियमनामुळे नागरिक तसेच कृषी पंपधारक शेतकऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन भारनियमनाबाबत योग्य नियोजन करावे. भारनियमनाची आवश्यकता असल्यास नागरिकांना पूर्वसूचना द्यावी, तसेच आपत्कालीन भारनियमन टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

जिल्ह्यातील विद्युत भारनियमनाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री गोरे यांनी आज दुपारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्यासह जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता व उपअभियंता उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या भारनियमनाची माहिती दिली. मागील दोन दिवसांत अनुक्रमे चार आणि सहा तास आपत्कालीन भारनियमन करण्यात आल्याची माहिती अधीक्षक



अभियंता सुनील माने यांनी दिली. यावर पालकमंत्री गोरे यांनी नाराजी व्यक्त केली. अचानक होणाऱ्या भारनियमनामुळे विशेषतः कृषी पंपधारक शेतकऱ्यांच्या कामात अडथळे निर्माण होतात. तसेच सर्वसामान्य नागरिकांनाही मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे अशा प्रकारचे आपत्कालीन भारनियमन टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारनियमन करणे अपरिहार्य असल्यास त्याबाबतची पूर्वसूचना ग्राहकांना देण्यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करावी. भारनियमनाचा कालावधी आणि त्यामागील कारणांची माहिती नागरिकांना स्पष्टपणे मिळेल, याची दक्षता घ्यावी, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

वीजपुरवठा खंडित झाल्याबाबत ग्राहकांनी दूरध्वनीवरून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात विचारणा केल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सौहार्दपूर्ण आणि समाधानकारक उत्तरे द्यावीत. नागरिकांशी उद्धटपणे अथवा चुकीच्या पद्धतीने संवाद साधू नये. ग्राहकांना भारनियमनाचा कालावधी, कारणे आणि वीजपुरवठा सुरळीत होण्याबाबतची उपलब्ध माहिती स्पष्टपणे द्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

दरम्यान, पंढरपूर विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याने केलेल्या आक्षेपार्ह विधानाबाबत पालकमंत्री गोरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावून त्याच्याकडून खुलासा घेण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनीही जिल्ह्यातील सर्व विद्युत अधिकाऱ्यांना ग्राहकांच्या भावना लक्षात घेऊन जबाबदारीने, संयमाने आणि सौहार्दपूर्ण पद्धतीने संवाद साधण्याच्या सूचना दिल्या. वीजपुरवठ्याबाबत नागरिकांना शक्य तेवढी मदत करावी आणि त्यांच्या तक्रारींचे समाधानकारक निराकरण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# इंधन दरवाढीचा फटका; स्टार एअरची सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** स्टार विमान कंपनीकडून सोलापूर ते मुंबई विमान सेवा बंद केल्या बाबतचे पत्र जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्टार एयर विमान कंपनीला विचारणा केली असता त्यांच्याकडून खालील प्रमाणे उत्तर प्राप्त झालेले आहे.

### स्टार एअर कंपनीचा खुलासा-

विमान इंधनाच्या (एटीएफ) किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने सोलापूर-मुंबई विमानसेवा सुरू ठेवणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे कारण देत स्टार एअरने ही सेवा बंद केली आहे. सोलापूर ते मुंबई विमान सेवेसह नांदेड ते मुंबई, बेळगाव ते मुंबई तसेच गुजरात ओरिसा या राज्यातूनही विमान सेवा बंद करण्यात आलेल्या आहेत. मागील दोन वर्षांपासून विमान वाहतूक क्षेत्राला विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, वाढत्या इंधन दराचा मोठा फटका विमान कंपन्यांना बसत आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये विमान इंधनाची किंमत सुमारे ६० रुपये प्रतिलिटर होती. सप्टेंबर २०२६ मध्ये ही किंमत वाढून सुमारे १२२ रुपये प्रतिलिटर झाली आहे. त्यामुळे तुलनेने छोटी विमान कंपनी असलेल्या स्टार एअरला वाढत्या इंधन खर्चाचा मोठा आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

सोलापूर-मुंबई विमानसेवेमुळे कंपनीला प्रति महिन्याला मोठे नुकसान होत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. राज्य शासनाकडून कंपनीला विविध माध्यमातून मदत करण्यात आली असून, फंडिंग निधीत वाढ केल्यामुळे काही प्रमाणात नुकसान भरून काढण्यास मदत झाली. मात्र, इंधनाच्या किमतीत झालेल्या मोठ्या वाढीमुळे सेवा सुरू ठेवणे आर्थिकदृष्ट्या अत्यंत जिकिरीचे झाले आहे.

या वाढत्या खर्चामुळे सोलापूर-मुंबई विमानसेवा सध्या बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती स्टार एअरकडून देण्यात आली आहे. त्यामुळे सोलापूरच्या विमानसेवेला पुन्हा एकदा इंधन दरवाढीचा मोठा फटका बसला आहे.

### मुंबई येथे ९ सप्टेंबर रोजी बैठक

सोलापूर ते मुंबई ही विमानसेवा स्टार एयरने बंद केल्याने त्या अनुषंगाने मुंबई येथे ९ सप्टेंबर रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या बैठकीमध्ये विमान सेवा पुन्हा सुरू करण्याच्या अनुषंगाने सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे, असे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आलेले आहे.

## संपादकीय

# दहीहंडी नव्हे, ही तर 'पुस्तक हंडी'!

सणांच्या उत्साहाला शिक्षणाची जोड देणारा पांडववाडी शाळेचा आदर्श उपक्रम, महाराष्ट्र यांचं नक्कीच अनुकरण करेल..!

दहीहंडी म्हटले की आता पुण्याचे विद्यानंद बापट व डीजेचा दणदणाट डोळ्यासमोर आल्या शिवाय राहत नाही. थरावर थर रचणारे गोविंदा आणि नेते व राजकारणी नेते व त्यांचे कार्यकर्ते स्टेजवर महिलांना थिरकायला लावणारे वातावरण डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र येवला तालुक्यातील पांडववाडी (कुसमाडी) जिल्हा परिषद शाळेने याच उत्सवाला ज्ञानाची आणि शिक्षणाची जोड देत एक वेगळीच वाट दाखवली आहे. 'दहीहंडी'ऐवजी साजरी झालेली 'पुस्तक हंडी' ही केवळ अभिनव कल्पना नाही, तर बदलत्या शिक्षणपद्धतीचा सुंदर संदेश आहे.

हंडीत दही-दूध किंवा बक्षिसांऐवजी इंग्रजी कृती, गीतगायन, शब्दकोडी, समानार्थी-विरुद्धार्थी शब्द, सामान्यज्ञानाचे प्रश्न, सुविचार, भाषण, नृत्य अशा विविध उपक्रमांच्या चिठ्ठ्या ठेवण्यात आल्या. हंडी फोडल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती आलेली चिठ्ठी म्हणजे त्याच्यासाठी एक छोटासा 'ज्ञानाचा धडा' ठरला. खेळता-खेळता शिकणे आणि शिकता-शिकता आनंद घेणे, हेच खरे बालशिक्षण!

आज ग्रामीण भागातील अनेक शाळांसमोर विद्यार्थ्यांना शिक्षणाशी जोडून ठेवण्याचे आव्हान आहे. पाठ्यपुस्तकातील धडे, परीक्षा आणि गुणांच्या चौकटीपलीकडे जाऊन मुलांच्या कल्पनाशक्तीला, आत्मविश्वासाला आणि सहभागाला वाव देणे गरजेचे आहे. पांडववाडी शाळेतील पुस्तक हंडी नेमके हेच करून दाखवते.

या उपक्रमाची आणखी एक जमेची बाजू म्हणजे स्थानिक संस्कृती आणि शिक्षण यांचा सुंदर मेळ. राधा, कृष्ण आणि मीराच्या वेशभूषेतील चिमुकले, फुलांनी सजवलेली हंडी आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या ज्ञानवर्धक चिठ्ठ्या—या माध्यमातून सणाचा आनंदही मिळाला आणि शिक्षणाची गोडीही लागली.

मुख्याध्यापक बालाजी नाईकवाडी यांनी मांडलेली संकल्पना आणि शिक्षक चंद्रभान पवार यांनी केलेले नियोजन कौतुकास्पद आहे. मात्र याचे खरे श्रेय त्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना द्यावे लागेल, ज्यांनी 'शिक्षण म्हणजे फक्त वर्गात बसून शिकणे' या पारंपरिक कल्पनेला आपल्या कृतीतून छेद दिला.

आज शिक्षण क्षेत्रात मोठमोठ्या योजना, डिजिटल वर्ग, स्मार्ट बोर्ड आणि विविध अभियानांची चर्चा होते. पण विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणत त्याच्या हातात ज्ञान देणारी कल्पना कोणत्याही महागड्या साधनांपेक्षा प्रभावी ठरू शकते, हे पुस्तक हंडीने सिद्ध केले आहे.

पांडववाडीतील हा उपक्रम एका शाळेपुरता मर्यादित राहू नये. राज्यातील प्रत्येक शाळेने आपल्या परिसरातील सण, परंपरा आणि स्थानिक संस्कृतीला शिक्षणाशी जोडणारे असे प्रयोग करायला हवेत. कारण उत्सव संपतो; पण उत्सवातून मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांच्या आयुष्यभर सोबत राहते.

दहीहंडी फुटली आणि चिठ्ठ्या खाली पडल्या; पण त्या चिठ्ठ्यांमधून अनेक चिमुकल्या मनांत ज्ञानाची ज्योत पेटली. म्हणूनच पांडववाडीचा 'पुस्तक हंडी' हा केवळ शाळेचा उपक्रम नसून, शिक्षणाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारा आदर्श आहे.

# राजे उमाजी नाईक : स्वराज्याची ज्वाला

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या राजकीय नेत्यांच्या कार्याचा इतिहास नाही. या इतिहासाच्या पाठीशी असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्ती, समाजघटक, कष्टकरी आणि वंचित जनसमुदायांच्या त्यागाची, संघर्षाची आणि स्वाभिमानाची परंपरा उभी आहे. परकीय सत्तेविरुद्धचा असंतोष देशाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत होता. महाराष्ट्राच्या भूमीतही ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराला प्रारंभीच विरोध करणाऱ्या अनेक धाडसी व्यक्तींनी आपल्या परीने प्रतिकार उभारला. या आरंभीच्या ब्रिटिशविरोधी संघर्षातील एक महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजे उमाजी नाईक. ७ सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका शूर व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे, तर स्वाभिमान, स्वराज्य, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभे राहण्याच्या मूल्यांचे स्मरण करणे होय.

राजे उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी (पुरंदर किल्ला) येथे झाला. त्यांचे वडील दादाजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीशी संबंधित होते. त्या काळात रामोशी समाजातील अनेक कुटुंबांवर किल्ल्यांची राखण, रात्रीची गस्त, पहारा आणि सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात. या पारंपरिक कामामुळे या समाजातील लोकांमध्ये धैर्य, शारीरिक कणखरपणा, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि परिसराची सूक्ष्म माहिती असण्याचे कौशल्य विकसित झाले होते. उमाजी नाईक यांचे बालपणही अशाच वातावरणात गेले. तलवार, भाला, कुऱ्हाड, धनुष्यबाण, गोफण आणि दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांच्या वापराचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साहसाबरोबरच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.

उमाजी नाईक यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी परिस्थिती ब्रिटिश सत्तेच्या विस्तारामुळे निर्माण झाली. ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील राजकीय आणि प्रशासकीय वर्चस्व वाढविल्यानंतर पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि स्थानिक व्यवस्था विस्कळीत होऊ लागल्या. अनेक समाजघटकांचे पारंपरिक अधिकार आणि उपजीविकेची साधने हिरावली जाऊ लागली. रामोशी समाजालाही या बदलाचा मोठा फटका बसला. पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीसारख्या पारंपरिक जबाबदाऱ्यांपासून त्यांना दूर करण्याचे प्रयत्न झाले. वतने, जमिनी आणि पारंपरिक अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे केवळ आर्थिक प्रश्न निर्माण झाला नाही, तर समाजाच्या स्वाभिमानालाही धक्का बसला. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार अचानक परकीय सत्तेच्या निर्णयामुळे संपुष्टात येत असल्याची भावना उमाजी नाईक यांच्या मनात तीव्र झाली.

या परिस्थितीत उमाजी नाईकांनी अन्याय स्वीकारण्याऐवजी प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशी समाजातील अनेक लोक एकत्र आले. मात्र त्यांचा संघर्ष केवळ एका समाजाच्या तक्रारींपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक जनतेवर होणारे आर्थिक शोषण, अन्याय आणि अधिकारशाली घटकांकडून होणारी पिळवणूक यांच्याविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. सावकार, जमीनदार आणि सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या घटकांविषयी त्यांचा रोष होता. त्यामुळे त्यांच्या संघर्षामध्ये राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक न्यायाची आकांक्षाही दिसून येते. तत्कालीन ग्रामीण समाजातील विषमता आणि असुरक्षितता लक्षात घेतल्यास उमाजी नाईकांच्या नेतृत्वामागे सामान्य लोकांच्या असंतोषाची मोठी पार्श्वभूमी होती.

उमाजी नाईकांचे सर्वांत प्रभावी सामर्थ्य म्हणजे त्यांचे संघटनकौशल्य. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना केवळ शस्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले नाही, तर परिस्थितीनुसार हालचाल करण्याची, गुप्त माहिती मिळविण्याची आणि ब्रिटिशांच्या सैन्यव्यवस्थेला चकवा देण्याची पद्धत विकसित केली. डोंगर-दऱ्या, जंगल, घाटवाटा आणि दुर्गम प्रदेश यांची त्यांना चांगली माहिती होती. या भौगोलिक ज्ञानाचा त्यांनी प्रभावी उपयोग केला. ब्रिटिश सैन्याची संख्या आणि साधने अधिक असतानाही स्थानिक परिस्थितीचा लाभ घेऊन उमाजी नाईकांच्या सहकाऱ्यांनी त्यांना अनेकदा अडचणीत आणले. अचानक हल्ला करून माघार घेणे, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घेणे या छापामार पद्धती त्यांच्या संघर्षाचे वैशिष्ट्य ठरल्या.

त्यांच्या या संघर्षात अनेक सहकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उमाजी नाईकांचे नेतृत्व वैयक्तिक शौर्यावर आधारित असले तरी त्यामागे संघटित लोकशक्ती होती. हीच त्यांच्या चळवळीची खरी ताकद होती. ब्रिटिशांच्या आधुनिक सैनिकी यंत्रणेसमोर स्थानिक लोकांच्या सहकार्याने उभा केलेला हा प्रतिकार त्या काळच्या परिस्थितीत अत्यंत धाडसी होता. त्यांच्या हालचालींमुळे ब्रिटिश




प्रशासनाला मोठी चिंता निर्माण झाली. एका विशिष्ट प्रदेशापुरता मर्यादित न राहता हा असंतोष व्यापक होऊ शकतो, याची जाणीव ब्रिटिशांना झाली होती.

उमाजी नाईकांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वराज्याची त्यांची कल्पना. त्यांनी स्वतःला 'राजे' म्हणून संबोधले आणि ब्रिटिशांच्या प्रशासकीय सत्तेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी त्यांनी न्यायनिवाड्याची व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. १८२७ मध्ये त्यांच्या जाहीर आवाहनातून ब्रिटिशांच्या महसूलव्यवस्थेला सहकार्य न करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध उभे राहण्याचा संदेश देण्यात आला. ही भूमिका त्या काळातील परिस्थितीत अत्यंत धाडसी होती. ब्रिटिश सत्ता हळूहळू आपले प्रशासकीय जाळे मजबूत करत असताना तिच्या महसूलव्यवस्थेला विरोध करणे म्हणजे त्यांच्या शासनव्यवस्थेच्या मुळालाच आव्हान देणे होते.

१८३१ मधील उमाजी नाईकांचा जाहीरनामा त्यांच्या राजकीय विचारांच्या व्यापकतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानला जातो. या आवाहनातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक प्रतिकार उभारण्याची भूमिका स्पष्ट होते. ब्रिटिशांना महसूल देऊ नये, त्यांच्या सत्तेला सहकार्य करू नये आणि आपल्या भूमीच्या स्वाधिकारासाठी संघर्ष करावा, असा त्यामागील संदेश होता. विशेष म्हणजे या आवाहनाचा विस्तार एका समाजापुरता किंवा एका गावापुरता मर्यादित नव्हता. हिंदुस्थानातील विविध घटकांनी एकत्र येऊन परकीय सत्तेविरुद्ध उभे राहावे, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना त्या काळात आजच्या अर्थाने विकसित झालेली नसली तरी परकीय सत्तेविरुद्ध व्यापक जनप्रतिरोधाची कल्पना त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. म्हणूनच उमाजी नाईकांच्या कार्याचा अभ्यास केवळ स्थानिक बंड किंवा उठाव म्हणून न करता भारतीय स्वातंत्र्याच्या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.

उमाजी नाईकांच्या जीवनात संघर्षाबरोबरच चढ-उतारही आले. काही काळ त्यांनी ब्रिटिशांशी तडजोड केली आणि आत्मसमर्पण केले. त्यांना ब्रिटिश प्रशासनाकडून काही जबाबदारीही देण्यात आली. पुणे आणि सातारा परिसरातील शांतता राखण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. परंतु ब्रिटिश प्रशासन आणि उमाजी नाईक यांच्यातील मूलभूत अविश्वास दूर झाला नाही. त्यांच्या हालचालींविषयी पुन्हा संशय निर्माण झाला आणि ब्रिटिशांनी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले. यावरून त्यांच्या जीवनातील संघर्ष हा एका सरळ रेषेत चाललेला नव्हता, तर तत्कालीन राजकीय परिस्थिती, स्थानिक संबंध आणि ब्रिटिश धोरणे यांच्याशी सतत झुंज देत पुढे गेलेला होता.

ब्रिटिश प्रशासनाने उमाजी नाईकांना पकडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्यात आले. अखेरीस ८ ऑगस्ट १८३१ रोजी त्यांच्या पकडीसाठी दहा हजार रुपयांचे मोठे बक्षीस आणि चारशे बिघे जमीन देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेवरून उमाजी नाईक ब्रिटिश प्रशासनासाठी किती मोठे आव्हान ठरले होते, याची कल्पना येते. दीर्घकाळ त्यांचा शोध घेतल्यानंतर विश्वासघातामुळे त्यांना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. १५ डिसेंबर १८३१ रोजी उमाजी नाईक ब्रिटिशांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्यात उमाजी नाईकांना फाशी देण्यात आली. एका तरुण वयात सुरू झालेला त्यांचा संघर्ष अशा प्रकारे संपला; परंतु त्यांच्या बलिदानाने निर्माण केलेली प्रेरणा संपली नाही. उलट त्यांच्या मृत्यूनंतरही ब्रिटिशविरोधी प्रतिकाराच्या इतिहासात त्यांचे नाव कायम राहिले. १८५७ च्या व्यापक उठावापूर्वीच भारताच्या विविध भागांत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष आणि प्रतिकाराची विविध रूपे दिसत होती. महाराष्ट्रातील या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेत उमाजी नाईकांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ उच्चभ्रू किंवा राजकीय नेतृत्वापुरती मर्यादित नव्हती; ती सामान्य लोकांच्या मनातही खोलवर रुजलेली होती.

उमाजी नाईकांच्या इतिहासाचा विचार करताना वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या योगदानाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. इतिहासलेखनामध्ये अनेकदा राजे, सरदार, युद्धे आणि मोठ्या राजकीय घटनांना केंद्रस्थानी ठेवले जाते. मात्र त्या घटनांच्या पाठीमागे सामान्य जनतेचे योगदान, स्थानिक उठाव आणि सामाजिक संघर्ष दडलेले असतात. उमाजी नाईकांचा इतिहास या दुर्लक्षित बाजूकडे आपले लक्ष वेधतो. एका पारंपरिक व्यवसायावर आणि जीवनपद्धतीवर अवलंबून असलेल्या समाजघटकाने परकीय सत्तेच्या हस्तक्षेपाला दिलेला प्रतिकार हा सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केवळ शौर्यकथेच्या चौकटीत न करता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात केले पाहिजे.

आज आपण लोकशाही आणि संविधानाच्या आधारावर चालणाऱ्या भारतात जगत आहोत. त्यामुळे उमाजी नाईकांच्या संघर्षाचा अर्थ त्यांच्या काळातील सशस्त्र प्रतिकाराची पुनरावृत्ती असा घेणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या जीवनातून आजच्या समाजाने घ्यायचा संदेश वेगळा आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, आपल्या अधिकारांची जाणीव ठेवणे, शोषित आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि लोकशाही मार्गाने परिवर्तन घडवून आणणे ही त्यांच्या स्मृतीची आधुनिक व्याख्या ठरू शकते. आज अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संविधान, कायदा, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि लोकशाही संस्था आपल्याकडे आहेत. या साधनांचा जबाबदारीने आणि विवेकपूर्ण वापर करणे हीच आधुनिक काळातील संघर्षाची दिशा आहे.

उमाजी नाईकांच्या जयंतीचे महत्त्व म्हणूनच केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण करण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनातील स्वाभिमान, धैर्य, संघटनशक्ती आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांनी इतिहासाकडे केवळ गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्या सामाजिक परिस्थितीत एखादा संघर्ष निर्माण झाला, त्यामागे कोणते आर्थिक आणि राजकीय घटक होते, सामान्य लोकांची भूमिका काय होती आणि त्या संघर्षातून पुढील समाजाला काय शिकता येते, याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासातून इतिहास जिवंत होतो आणि वर्तमानाला दिशा देण्याची क्षमता त्याला प्राप्त होते.

आजही समाजात आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, संधीतील असमानता, शोषण आणि दुर्बल घटकांच्या अधिकारांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, प्रत्येकाला शिक्षणाची आणि प्रगतीची समान संधी देणे, श्रमाचा सन्मान करणे आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करणे ही आधुनिक लोकशाहीची जबाबदारी आहे. उमाजी नाईकांच्या स्मृतीचे खरे सार याच मूल्यांमध्ये आहे. त्यांच्या नावाने कार्यक्रम आयोजित करणे, प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे किंवा घोषवाक्ये देणे यापलीकडे जाऊन त्यांच्या संघर्षाचा सामाजिक आशय समजून घेणे गरजेचे आहे. इतिहासातील नायकांच्या स्मृती तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा त्या वर्तमानातील समाजनिर्मितीशी जोडल्या जातात.

राजे उमाजी नाईक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्वाभिमानाचे आणि प्रतिकाराचे तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांनी ज्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला, तो काळ अत्यंत प्रतिकूल होता. साधनांची कमतरता, संघटित ब्रिटिश सैन्य, राजकीय दबाव आणि सततचा पाठलाग या सर्व परिस्थितींमध्ये त्यांनी आपल्या ध्येयाचा पाठपुरावा केला. त्यांच्या जीवनाचा शेवट फाशीच्या दोरीवर झाला; मात्र त्यांचा विचार आणि संघर्षाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या जीवनाकडे पाहताना आपल्याला जाणवते की स्वातंत्र्य ही केवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्याची संकल्पना नसून ती माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी मूल्यव्यवस्था आहे.

७ सप्टेंबरला राजे उमाजी नाईक जयंती साजरी करताना म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच समाजातील अन्याय आणि विषमता कमी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्वाभिमानाची ज्योत ज्ञानाने अधिक प्रखर करणे, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणे, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. उमाजी नाईकांनी परकीय सत्तेविरुद्ध पेटविलेली प्रतिकाराची ज्वाला आज संविधानिक मूल्यांच्या प्रकाशात पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या स्मृतीतून धैर्य घ्यावे, त्यांच्या संघर्षातून स्वाभिमान शिकावा आणि त्यांच्या जीवनातून न्याय्य समाजनिर्मितीची प्रेरणा घ्यावी. इतिहासातील त्यांचे स्थान केवळ भूतकाळात नाही; अन्यायाविरुद्ध जागृत राहणाऱ्या प्रत्येक पिढीच्या वर्तमानात आणि भविष्यातही राजे उमाजी नाईकांची स्वराज्याची हाक निनादत राहील.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

## दोन-पाच गुंठे जमीनही आता...

आहे. संबंधित क्षेत्राचे जुने सातबारा उतारेही अजासीबत जोडावे लागतात.

कमी क्षेत्राची जमीन खरेदी करण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यानंतर संबंधित जागेची पाहणी, पंचनामा आणि कागदपत्रांची पडताळणी केली जाते. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर साधारणतः ३० दिवसांत परवानगी देण्याची तरतूद आहे. त्यामुळे नियमांचे पालन करून शेतकऱ्यांना घरकूल, विहीर किंवा शेतीच्या रस्त्यासाठी आवश्यक तेवढी कमी क्षेत्राची जमीन खरेदी करता येऊ शकते.

## SSC परीक्षेत मोठा गैरप्रकार

# विद्यार्थ्यांच्या जागी 10 'डमी' उमेदवारांकडून पेपर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात दहावीच्या (SSC) परीक्षेत मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. नंदेश्वर येथील श्री बाळकृष्ण विद्यालय परीक्षा केंद्रावर मराठी भाषेचा पेपर देण्यासाठी मूळ विद्यार्थ्यांच्या जागी 10 डमी उमेदवार बसले होते.

यामध्ये एका अल्पवयीन मुलीचाही समावेश आहे.

### हॉलतिकीट तपासताना प्रकार उघड

परीक्षा केंद्रावर हॉलतिकीट आणि शाळेचे ओळखपत्र तपासताना काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांवरील फोटो आणि प्रत्यक्ष पेपर देणाऱ्या व्यक्तींचे चेहरे जुळत नसल्याचे पर्यवेक्षकांच्या लक्षात आले. त्यानंतर राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून हॉलतिकीट तपासण्यात आले. यावेळी काही हॉलतिकीट बनावट असल्याचे समोर आले.

### सांगलीतील अकादमीशी संबंध

पोलिसांच्या तपासानुसार, हे डमी उमेदवार सांगली, इचलकरंजी आणि कर्नाटकातील अथणी येथील आहेत. डमी उमेदवार सांगलीतील पोलिस, सैन्य आणि वन विभागाच्या भरतीची तयारी करून घेणाऱ्या एका अकादमीत निवासी अभ्यासक्रमासाठी दाखल आहेत. या अकादमीमार्फतच डमी उमेदवारांचे रॅकेट चालत असल्याचा पोलिसांना संशय आहे.

### 10 जणांवर गुन्हा

या प्रकरणात नऊ तरुण आणि एका अल्पवयीन व्यक्तीविरोधात मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी बीएनएसच्या कलम 319, 336 आणि 337 अंतर्गत कारवाई केली आहे. नऊ आरोपींना न्यायालयाने 24 फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

### मूळ विद्यार्थ्यांवरही कारवाई

डमी उमेदवारांऐवजी ज्या विद्यार्थ्यांनी पेपर द्यायचा होता, त्यांनाही या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना एसएससी परीक्षेतील पुढील विषयांचे पेपर देता येणार नाहीत, अशी माहिती राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### पोलिसांकडून रॅकेटचा तपास

डमी उमेदवारांनी पैसे मिळाले नसल्याचा दावा केला आहे. या प्रकारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि यामागे संघटित रॅकेट आहे का, याचा मंगळवेढा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# सोलापूर शहरात 7 ते 21 सप्टेंबर 2026 दरम्यान मनाई आदेश लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तालय हद्दीत दि. 7 सप्टेंबर 2026 रोजी 00.01 वाजेपासून ते 21 सप्टेंबर 2026 रोजी मध्यरात्री 24.00 वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 37 (1) व (2) अन्वये हा आदेश जारी केला आहे.

### काय बाळगण्यास प्रतिबंध?

या कालावधीत शस्त्रे, अग्निशस्त्रे, बॅटन, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, विना परवाना बंदुका, चाकू, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई आहे. परवानाधारक बंदुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची विशिष्ट परवानगी घेतल्यासच सूट राहील.

तसेच कोणताही स्फोटक पदार्थ, दगड, क्षेपणास्त्रे, ती फेकण्याची उपकरणे वाहून नेणे, गोळा करणे व तयार करणे, व्यक्ती-प्रेत-आकृती-पुतळ्यांचे प्रदर्शन, सार्वजनिक ठिकाणी टीका करणारे उच्चार, गाणी, संगीत वाजवणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

शालीनता किंवा शिष्टाचाराला बाधा आणणारी चित्रे, चिन्हे, फलक, वस्तू तयार करणे, प्रदर्शित करणे किंवा प्रसारित करणे, ज्यामुळे सामाजिक नैतिकता, सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येईल किंवा राज्यव्यवस्थेविरुद्ध वातावरण निर्माण होईल, अशा कृतींनाही प्रतिबंध करण्यात आला आहे.

### उल्लंघन केल्यास कारवाई

प्रतिबंधित वस्तूंसह आढळल्यास कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत संबंधित व्यक्तीस निःशस्त्र केले जाईल. जप्त केलेली शस्त्रे, स्फोटके, क्षेपणास्त्रे राज्य सरकारकडे जमा करण्यात येतील.

### कोणाला सूट

1. सरकारी/निमसरकारी सेवेत असलेल्या व कर्तव्यासाठी शस्त्र बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्तींना.

2. खाजगी सुरक्षा रक्षक, गुरखा, चौकीदार यांना ३.५ फूट लांबीपर्यंतची लाठी बाळगण्यास परवानगी.

### पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावावर बंदी

महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (3) नुसार याच 15 दिवसांच्या कालावधीत सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत पाच किंवा अधिक व्यक्तींच्या कोणत्याही संमेलनास, मिरवणुकीस, तसेच मिरवणुकीत लाऊडस्पिकर, वाद्य, बँड व फटाके वाजवण्यास मनाई आहे.

## गॅस बुकिंग नियमाविरोधात शिवसेना मैदानात

# जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** गॅस सिलेंडरच्या बुकिंगसाठी भारत पेट्रोलियम कंपनीकडून तब्बल ४५ दिवसांचा कालावधी ठेवण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांसह महिला भगिनींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. इतर गॅस कंपन्यांकडून सुमारे २५ दिवसांनी गॅस बुकिंगची सुविधा उपलब्ध होत असताना भारत पेट्रोलियमकडून अद्यापही ४५ दिवसांचा कालावधी ठेवण्यात आल्याचा आरोप शिवसेनेचे माळशिरस तालुका ओबीसी चे प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी करत ग्राहकांना गॅस मिळण्यासाठी विलंब होत असलेल्याने गॅस प्रश्नावर शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.

यावाबत पडोळ, शेटे, गुंड व जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांना शिवसेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. निवेदनाद्वारे भारत पेट्रोलियम कंपनीकडून सुरू असलेल्या गॅस पुरवठा व बुकिंग प्रक्रियेबाबत तातडीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाईची परिस्थिती निर्माण झाली



होती. संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून शहर व ग्रामीण भागासाठी काही निकष निश्चित करण्यात आले होते. मात्र, युद्धजन्य परिस्थिती निवळल्यानंतरही गॅस बुकिंगच्या कालावधीत कंपन्यांमध्ये असमानता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हिंदुस्थान पेट्रोलियमचा गॅस सुमारे २५ दिवसांनी उपलब्ध होत असताना भारत पेट्रोलियमकडून ४५ दिवसांचा बुकिंग कालावधी ठेवण्यात आल्याने ग्राहकांची गैरसोय होत आहे, असा दावा यावेळी करण्यात आला. विशेषतः घरगुती गॅसचा वापर करणाऱ्या महिलांना या समस्येचा मोठा फटका बसत असून त्यांच्या मनात तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे निवेदनकर्त्यांनी सांगितले.गॅस सिलेंडर हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक घटक असल्याने बुकिंगसाठी एवढा मोठा कालावधी ठेवणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित करण्यात आला. संबंधित विभागाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन भारत पेट्रोलियम कंपनीच्या बुकिंग प्रक्रियेचा तातडीने आढावा घ्यावा आणि नागरिकांना दिलासा मिळेल, अशी कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.या निवेदनाच्या वेळी ओबीसी महासंघाचे प्रदेश उपप्रमुख तानाजीराव साठे, माळशिरस तालुका ओबीसी चे प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील,शिवसेनेचे तालुकाप्रमुख तानाजीराव भोळे-पाटील, जयंतीचे तालुकाप्रमुख शहाजी काळे, पश्चिम महाराष्ट्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष एन. के. साळवे, माळशिरस शहर संघटक पोरे भाऊ, विद्यार्थी सेनेचे प्रमुख शिवदत्त भोळे-पाटील, दहेगाव शहरप्रमुख दत्ता बोडरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गॅस बुकिंगचा ४५ दिवसांचा कालावधी कमी करून इतर गॅस कंपन्यांप्रमाणे ग्राहकांना लवकर सिलेंडर उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## वात्रटिका

### व्याकूळ झाले

विस्तार होणार होणार
लय वेळा प्रचार झाला...
कोण आशा लावून तर
कोण झुरताना दिसला...
नको नको म्हणणारा सुद्धा
रांगेत उभा राहिला आहे...
त्याला माहित नाही,त्याचा
व्याकूळ चेहरा पाहिला आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# टेंभुर्णीत कायदा-सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा!

## गंभीर गुन्हे, अवैध धंद्यांच्या आरोपांनी नागरिक संतप्त

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढती गुन्हेगारी, कथित अवैध धंदे आणि गंभीर घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कुडूर्वाडी बायपास रोडवरील महिलेवरील कथित सामूहिक अत्याचाराच्या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकरणातील काही संशयितांना राजकीय हस्तक्षेपामुळे गुन्ह्यातून वगळण्यात आल्याचा आरोप होत असून, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून पीडितेला न्याय मिळावा, अशी मागणी होत आहे. त्याचबरोबर अवैध दारूविक्री, गुटखा विक्री, मटका-जुगार यांसारखे कथित अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी, गैरप्रकारांविरोधात आवाज उठविणाऱ्या पत्रकारांना कथित दमदाटी आणि पोलीस ठाण्याच्या समोरूनच मोटारसायकल चोरीला जाण्याच्या घटनेमुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांची तातडीने बदली करून टेंभुर्णीर्ला कर्तव्यदक्ष व कठोर अधिकारी देण्यात यावा, अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून जोर धरू लागली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात येत आहे.

कुर्डूवाडी बायपासवरील गंभीर प्रकरणामुळे टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. गुन्ह्याच्या तपासात कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा बाह्य दबाव नसावा आणि सर्व संबंधितांची भूमिका तपासून कायद्यानुसार कारवाई व्हावी, अशी नागरिकांची मागणी आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये पीडितेला न्याय मिळणे आणि तपास प्रक्रिया पारदर्शक राहणे आवश्यक असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, टेंभुर्णी परिसरात अवैध दारू, गुटखा, मटका-जुगार आदी कथित अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. या प्रकारांवर नियमित व प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप असून, अवैध धंद्यांच्या माध्यमातून गुन्हेगारी प्रवृत्तींना बळ मिळत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या व्यवसायांमागे कोणाचे पाठबळ आहे, याची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

अवैध धंदे आणि स्थानिक प्रश्नांवर वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना दमदाटी केली जात असल्याचे आरोपही पुढे आले आहेत. पत्रकारांना त्यांच्या कामापासून परावृत्त करण्यासाठी दबाव आणला जात असेल तर ही बाब गंभीर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन धमकी अथवा दबाव आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

यातच पोलीस दलात प्रदीर्घ सेवा बजावलेल्या सुधाकर जाधव यांची मोटारसायकल टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या समोरून चोरीला गेल्याची घटना चर्चेचा विषय ठरली आहे. पोलीस ठाण्याच्या परिसरातच वाहन चोरीला जाणे ही बाब नागरिकांच्या दृष्टीने गंभीर असून, या प्रकरणातील आरोपींचा तातडीने शोध घेऊन वाहन हस्तगत करण्याची मागणी होत आहे.

या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णीतील कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात, गंभीर गुन्ह्यांचा निष्पक्ष तपास करावा आणि कथित अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांची बदली करून संवेदनशील टेंभुर्णी पोलीस ठाण्याचा कारभार सक्षम अधिकाऱ्याकडे सोपवावा, अशी मागणी जोर धरत आहे. याबाबत टेंभुर्णी प्रेस क्लब व टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघ येणाऱ्या 16 तारखेला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना निवेदन देणार आहेत या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास जनता व सामाजिक संघटनांच्या माध्यमातून आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात येत असल्याने आता वरिष्ठ पोलीस प्रशासन या तक्रारींची कशी दखल घेते, याकडे टेंभुर्णीकरांचे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणाराच शिक्षक आदर्श- अण्णाराव कुंभार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून प्रभावी अध्यापन करावे. विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत संस्कार व मूल्ये रुजविणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणारे शिक्षकच खऱ्या अथार्ने आदर्श ठरतात, असे प्रतिपादन नेताजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले.

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षक राजकुमार मरगुरे यांना ह्यतपोरत्नं गुणवंत शिक्षक पुरस्कारह्ण प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. मरगुरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच, संस्थेतील सुमारे १५० शिक्षकांना लेखणी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित



करण्यात आले.

प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी, तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. राजराजेश्वरी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, सुजाता मरगुरे, सतीश वाले, शाहीर सय्यद, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयलक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका अश्विनी गंगुल आदी उपस्थित होते

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर म्हणाले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिराव फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचा प्रकाश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी महान कार्य केले. त्याच विचारांची प्रेरणा घेऊन संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या अथक प्रयत्नांतून नेताजी शिक्षण संस्था नावारूपाला आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले, तर शितल पाटील यांनी आभार मानले.

यावेळी मलबार गोल्ड अँड डायमंड कंपनीतर्फे सर्व शिक्षकांना भेटवस्तू देऊन गुरुवर्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# नेताजी प्रशालेस मुख्याध्यापक संघाचा 'आदर्श शाळा पुरस्कार' जाहीर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्यावतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'आदर्श शाळा पुरस्कार' जाहीर झाला आहे.

पुरस्कार वितरण रविवार, दिनांक १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता संतराज पॅलेस, इसबावी, पंढरपूर येथे करण्यात येणार आहे. यावेळी शिक्षक आमदार जयंत आसगावकर, पुणे विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे, पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हा नियंत्रक समिती अध्यक्ष सुभाषराव माने आदी मान्यवरांच्या हस्ते शाळेला सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

१९९० साली कामगार वसाहतीतील मुलांसाठी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी या शाळेची स्थापना केली होती. 'कामगार मुलांची शाळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विद्यालयातून आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडले असून ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी व सर्व शिक्षक वर्ग सातत्याने प्रयत्नशील आहेत.

कला, क्रीडा, बाह्य परीक्षा, स्काऊट-गाईड, आरोग्य व रक्तदान शिबीर, शिष्यवृत्ती वाटप अशा विविध शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांचे आयोजन शाळेच्यावतीने करण्यात येते. सोलापूर शहरातून एकमेव नेताजी प्रशालेस हा पुरस्कार जाहीर झाल्याने निलम नगर परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रेणुका पतसंस्थेची कार्यक्षमता व पारदर्शकता असल्याने संस्था प्रगतीपथावर - राम सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** संस्था स्थापन करणे सोपे आहे परंतु ती टिकवणे खूप कठीण आहे. माळशिरस तालुक्यात अनेक संस्था आल्या सभासदांना घेऊन बुडाल्या परंतु सभासदांनी रेणुका पतसंस्थेवर विश्वास ठेवल्याने गेले ४२ वर्ष पतसंस्थेची कार्यक्षमता व पारदर्शकता असल्याने रेणुका पतसंस्था प्रगतीपथावर असल्याचे मत मा.आ. राम सातपुते यांनी व्यक्त केले.



> सभासद, ठेवीदार, कर्जदार यांच्या सहकार्याने पतसंस्थेची यशस्वी वाटचाल असून सभासद संख्या ११८६ झाली आहे. सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानूनच पतसंस्थेचे काम. भाग भांडवल २ कोटी ६३ लाख, ठेवी ६४ कोटी ४३ लाख असून व्यापारी वगार्चा विश्वास असल्याने ठेवी मध्ये सातत्याने वाढ होत असून ३ कोटी ८५ लाख कर्ज वाटप केले असून २६ कोटीची गुंतवणूक तर रेणुका पतसंस्थेची ३३ कोठीची वार्षिक उलाढाल असून ४.५० कोटी नफा झाला आहे पतसंस्थेचे पदाधिकारी संचालक मंडळ हे पारदर्शकता ठेवून काम करत आहेत.
>
> **बाबाराजे देशमुख**
> सोलापूर जि.प.चे.मा. उपाध्यक्ष तथा पतसंस्थेचे चेअरमन

ते नातेपुते येथे घेण्यात आलेल्या रेणुका ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, रेणुका महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, हर हर महादेव ग्रामीण बिगर शेती पतसंस्था व समाजभूषण नानासाहेब देशमुख विकास सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बोलत होते. ते पुढे बोलत असताना म्हणाले की, बाबाराजे देशमुख यांना सहकाराचा वारसा समाज भूषण नानासाहेब देशमुख यांच्यापासून आहे. नातेपुते गावाची वेगळी संस्कृती असून हे गाव सर्व समाजाला, गोरगरिबांना सोबत घेऊन चालणारे गाव आहे. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली येणारी पिढी चांगली काम करते आहे. मागील ५ वर्षात ३५ कोठी निधी नातेपुते गावासाठी आणून गावचा विकास केला असल्याचे मत मा. आ. राम सातपुते यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास मा. आ.राम सातपुते, मा.आ.रामहरी रुपनवर सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा पतसंस्थेचे चेअरमन बाबाराजे देशमुख, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मामासाहेब पांढरे, महेश शेटे, अँड. डी. एन. काळे, डॉ.एम.पी.मोरे, अँड. शिवाजीराव पिसाळ, अँड.बी.वाय. राऊत, मा.पं.स. सदस्य माऊली पाटील, हनुमान धालपे, बाहुबली चंकेश्वरा, अतुल बावकर, गणेश उराडे, नाथाजीराव देशमुख, अमरशील देशमुख, हेमंत देशमुख, भैय्यासाहेब देशमुख, मालोजीराजे देशमुख, धनाजीराव देशमुख, रणवीर देशमुख, महिला पतसंस्थेच्या चेअरमन सुचित्रादेवी देशमुख, श्रुतिका देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. चार संस्थेचे सचिव उमेश कुचेकर, अशोक कुचेकर, उमेश पोतदार, बापूराव पाटील यांनी संस्थेचे अहवाल वाचन केले. तसेच उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते समाजभूषण नानासाहेब देशमुख लखपती योजना व सोनेतारण कर्ज व आवर्तक ठेव योजनेचे उद्घाटन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सत्कार घेण्यात आले. संचालक मालोदर्जा देशमुख प्रास्ताविक करत असताना म्हणाले की, समाजभूषण नानासाहेब देशमुख यांनी १४ जानेवारी १९८६ साली पतसंस्थेची स्थापना केली. पतसंस्थेला ४६ वर्ष पूर्ण झाले असून अनेक सुशिक्षित बेरोजगार गरजू नागरिकांना व्यावसायिकासाठी कर्ज पुरवठा केल्याने हजारो कुटुंब अनेकांचे संसार पतसंस्थेच्या माध्यमातून उभा राहिली व त्याचा सार्थ अभिमान वाटत असल्याचे मत मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी रेणुका परिवारावर प्रेम करणारे सर्व नागरिक, नातेपुते नगरपंचायतीचे नगरसेवक, अनेक पतसंस्थांचे चेअरमन, वरील सर्व संस्थांचे पदाधिकारी, पिग्मी एजंट, सभासद, कर्जदार, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृह विज्ञान महिला महाविद्यालयामध्ये पोषण सप्ताह साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृह विज्ञान महिला महाविद्यालयामध्ये अन्न व पोषण शास्त्र विभागातर्फे पोषण सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी पाककला स्पर्धेचें आयोजन करण्यात आले. या स्पधेर्चा विषय नाविन्यपूर्ण पाककला स्पर्धा ही होती. पाककला स्पर्धेमध्ये गृह विज्ञान महिला महाविद्यालयाच्या तसेच जनरल सायन्स च्या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमित घाडगे होते.



या पाककला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. तहिरिम बागवान एफ. वाय.बी. एस्सी.तसेच द्वितीय क्रमांक कु.ईश्वरी कोथमीरे एस.वाय.बी. एस्सी.व तृतीय क्रमांक कु.रजिया शेख एफ.वाय.बी.एस्सी.यांनी पटकावला.या पाककला स्पर्धेचे परीक्षण जिजामाता कन्या प्रशालाच्या कु.एम.डी.भांगे व डॉ.भारती भोसले यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमित घाडगे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अर्पिता कोळी हिने केले तसेच आभार प्रदर्शन कु.सांची गायकवाड हिने केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ.जयशीला मनोहर,डॉ.भारती भोसले,रमजान शेख,दीपक शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालयात शिक्षक दिन संपन्न



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रम उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. जाधव , कार्यालयीन अधीक्षक तानाजी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे अध्यापन केले. उत्कृष्ट सादरीकरणासाठी आकांक्षा मिरगणे व साक्षी इनामे यांना पारितोषिक देण्यात आले.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ‘Catch Phrase of the Teacher’ तसेच शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा विशेष व्हिडिओ सादर केला. शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनात्मक उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी नंदन जगदाळे यांनी विद्यार्थ्यांनी उत्तम शेतकरी व सक्षम कृषी उद्योजक बनून कृषीपूरक उद्योगांना चालना द्यावी, असे आवाहन केले. जयकुमार शितोळे यांनी विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेला शिक्षकांप्रती आदर व स्नेह कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

या कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ.शेंडे एस. एस., प्रा. गणेश जाधव प्रा.आदलिंगे आशा प्राध्यापक डॉ. गुरव सर इतर प्राध्यापक यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा जानराव यांनी, तर आभारप्रदर्शन दीप्ती वाघ यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**


मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 48

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 | | 7 | | | 6 |
| | 4 | | | | 6 | | | |
| 1 | 9 | | | | 4 | 7 | | 3 |
| | 7 | 8 | 4 | | | | 6 | 2 |
| | | 9 | 7 | | 3 | | 8 | 5 |
| | | | | 2 | | 3 | | 4 |
| | | 4 | 6 | | 2 | | | 1 |
| 2 | 5 | | 8 | | 1 | 6 | | |
| | 1 | 3 | | | 9 | | 2 | |

# जुनी पेन्शनचा प्रश्न सोडवा, अन्यथा पुन्हा आझाद मैदानावर येऊ - दत्तात्रय सावंत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी जुनी पेन्शन समन्वय संघाच्या वतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने सोलापुरात भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोचार्ला जिल्ह्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकुटुंब सहभागी झाले होते.

जुनी पेन्शन योजनेचा प्रश्न तत्काळ सोडवा अन्यथा पुन्हा आम्ही हजाराच्या संख्येने मुंबई येथील आझाद मैदानावर येऊ असा इशारा माजी शिक्षक आमदार सावंत यांनी सरकारला दिला आहे..

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या या मूक मोर्चामध्ये शिक्षकांनी हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन शासनाचे लक्ष वेधले. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सेवा सुरू केलेल्या अनेक शिक्षकांना सुरुवातीला अंशतः अनुदानित अथवा विनाअनुदानित तत्त्वावर सेवा बजावावी लागली. त्यानंतर शासनाच्या अनुदान धोरणानुसार त्यांना अनुदान प्राप्त झाले; मात्र पेन्शनच्या बाबतीत त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

'सेवा १ नोव्हेंबर २००५ पूर्वीची, मग पेन्शनची तारीख वेगळी का?' असा सवाल उपस्थित करत शिक्षकांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी केली. अनेक वर्षे शैक्षणिक क्षेत्रात सेवा बजावूनही निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शिक्षक दिनाच्या दिवशीच शिक्षकांना त्यांच्या न्याय्य हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. मूक मोर्चाच्या माध्यमातून शासनाला शांततापूर्ण पद्धतीने आपली मागणी पोहोचवण्यात आली.

मोर्चानंतर जिल्हा परिषद कार्यालय येथील पूनम गेट येथे एकत्रित जमा होऊन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# करमाळ्यात मराठा समाज आक्रमक

## मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ रास्ता रोको



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या बेमुदत आमरण उपोषणाला समर्थन देण्यासाठी करमाळा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने जोरदार रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे बायपास चौक परिसरातील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

आंदोलनादरम्यान सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी बायपास चौकात एकत्र येत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलकांनी राज्य सरकारच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला.

मराठा समाजातील पात्र बांधवांना हैदराबाद गॅझेटच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे आणि संबंधित प्रमाणपत्रांना वैधता देण्यात यावी, यासह विविध मागण्या आंदोलकांनी यावेळी मांडल्या. सरकारी पातळीवरील निर्णय प्रक्रियेत तसेच कागदपत्रांच्या बाबतीत मराठा समाजातील नागरिकांना त्रास होत असल्याचा आरोपही काही आंदोलकांनी केला. संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबतही आंदोलकांनी नाराजी व्यक्त केली.

मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

मराठा समाजाच्या मागण्या सरकारने तातडीने मान्य कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशारा आंदोलकांच्या वतीने देण्यात आला. तसेच राज्य शासनातील मंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना महाराष्ट्रात फिरू दिले जाणार नाही, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात आले.

आंदोलन शांततेच्या वातावरणात पार पडले. मात्र, रास्ता रोकोमुळे बायपास चौक परिसरातील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाला करमाळ्यातूनही समर्थन मिळत असल्याचे या रास्ता रोको आंदोलनातून दिसून आले.

# राष्ट्र उभारणीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची- राजन पाटील



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. यशपाल खेडकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच लोकनेते बाबुरावअण्णा पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी राजन पाटील म्हणाले, 'आपल्या संस्कृतीमध्ये ह्यमातृ देवो भव, पितृ देवो भव'याचबरोबर 'आचार्य देवो भव'असे म्हटले जाते. भारतीय लोकशाहीत वृत्तपत्रांना चौथा स्तंभ म्हटले जाते; मात्र राष्ट्र उभारणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात संस्कारांचे बीजारोपण करून त्यांना उत्तम नागरिक घडवावे.' प्रमुख पाहुणे डॉ. यशपाल खेडकर यांनी बदलती शिक्षणव्यवस्था, तिच्यासमोरील आव्हाने तसेच शिक्षक म्हणून काम करताना स्वतःमध्ये आवश्यक असणारे बदल याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी मोहोळ पंचायत समितीचे सभापती असलम चौधरी, सोलापूर जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी, श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, नगरसेवक नारायण गुंड, शहाजी गुंड, रवींद्र पाचपुंड, प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी, प्राचार्य महादेव चोपडे, प्राचार्य महेश करंडे, प्राचार्य मनीषा गुंड, मुख्याध्यापक रामचंद्र पाटील, मुख्याध्यापक संजय डोंगरे, केंद्रप्रमुख अमोल सुरवसे, माजी केंद्रप्रमुख महादेव माने, मुख्याध्यापिका सरस्वती वायचळ, तानाजी गुंड, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांनी प्रास्ताविक केले. सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले, तर माधव खरात यांनी आभार मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पंढरपूर फलटण रेल्वे मार्गाचा DPR तयार : खा. मोहिते-पाटील



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** दि. ४ सप्टेंबर २०२६ : पंढरपूर फलटण आणि देहू राष्ट्रीय रेल्वे मार्गादरम्यान रेल्वे जोडणी निर्माण करण्याबाबत खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी दिनांक २७ मार्च २०२६ रोजी लोकसभेतील शून्य प्रहरादरम्यान प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री वी. सोमण्णा यांनी लेखी उत्तर दिले आहे.

रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पंढरपूर –फलटण रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण कार्य पूर्ण झाले असून या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या महत्त्वपूर्ण रेल्वे मार्गाच्या पुढील प्रक्रियेला आता गती मिळण्याची अपेक्षा आहे.

DPR तयार झाल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनासह विविध संबंधित भागधारकांशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे.

तसेच नीती आयोग, केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित यंत्रणांकडून आवश्यक परीक्षण व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार असल्याचे रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, रेल्वे मंत्रालयाने प्रकल्प मंजुरीबाबतची प्रक्रिया ही सतत सुरू असणारी आणि गतिमान प्रक्रिया असल्याचे नमूद केले आहे. विविध संबंधित यंत्रणांकडून होणारे परीक्षण आणि आवश्यक मंजुरी यावर प्रकल्पाच्या अंतिम मंजुरीची कालमर्यादा अवलंबून असल्याचेही केंद्रीय रेल्वे राज्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात स्पष्ट केले आहे.

पंढरपूर– फलटण रेल्वे मार्गामुळे सोलापूर, माढा, पंढरपूर, माळशिरस तसेच फलटण परिसरातील दळणवळणाला मोठी चालना मिळण्यास मदत होणार असून, या मार्गामुळे धार्मिक पर्यटन, शेतीमालाची वाहतूक, उद्योग आणि स्थानिक रोजगाराच्या संधींना देखील बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी लोकसभेत सातत्याने हा प्रश्न उपस्थित करत आहेत, रेल्वे मंत्रालया बरोबर सतत लेखी पाठपुरावा करत आहेत. पंढरपूर फलटण रेल्वे मार्गचे सर्वेक्षण पूर्ण होऊन DPR तयार झाल्याची बाब या प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा मानली जात आहे.

# जिल्हा परिषदेचे स्वतंत्र ॲप: आरोग्य केंद्रे, उपचार, सुविधा व योजनांची माहिती मोबाईलवर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्य सेवा आणि सुविधांची माहिती घरबसल्या सहज उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत स्वतंत्र ॲप्लिकेशन विकसित करण्यात येणार आहे. या ॲपद्वारे जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांची माहिती, उपलब्ध उपचार व सुविधा, संपर्क क्रमांक तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती नागरिकांना एका क्लिकवर मिळणार आहे. आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आरोग्य समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

प्रस्तावित ॲपमध्ये जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसह आरोग्य विभागाशी संबंधित आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांना आपल्या परिसरातील उपलब्ध आरोग्य सुविधा सहज शोधता याव्यात, तसेच आवश्यकतेनुसार संबंधित आरोग्य केंद्राशी संपर्क साधता यावा, या उद्देशाने ॲप विकसित करण्यात येणार आहे.

बैठकीत राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या STEMI प्रकल्पाचा आढावाही घेण्यात आला. ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ७ हजार ९४७ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी १६ रुग्णांमध्ये हृदयविकाराचे निदान झाले. या रुग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार देण्यात आले. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सध्या १ हजार ५७१ क्षयरुग्ण उपचाराखाली असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. संशयित क्षयरुग्णांचे लवकर निदान व्हावे, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर येणाऱ्या संशयित रुग्णांची एक्स-रे तपासणी करण्याच्या सूचना सभापती सावंत यांनी दिल्या

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक औषधे आणि आरोग्यविषयक साहित्याचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आरोग्य विभागाने योग्य नियोजन करावे, अशा सूचना सावंत यांनी दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये नागरिकांना आवश्यक सेवा वेळेत उपलब्ध होण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीस आरोग्य समितीचे सदस्य व्यंकटराव भालके, सविता कोकाटे, संगीता दुधाळ, जिल्हा परिषद आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यालय अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# चौंडेश्वरवाडी येथे वेलकम मेळावा संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील चौंडेश्वरवाडी येथे वेलकम मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम सरपंच अलका शिवाजीराव इंगवले–देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बानु सय्यद, बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवाड, अंगणवाडी सुपरवायझर रिता चव्हाण व अंगणवाडीच्या सर्व सेविका, मदतनीस व बालक पालक उपस्थित होते. यावेळी स्वागत समारंभा नंतर बालगीते, बडबडगीते खेळ, शिक्षण, पूर्व आरोग्य मार्गदर्शन, तसेच बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी फळे, कडधान्य, पालेभाज्या महत्वाचे असल्याचे सांगण्यात आले. तर अंगणवाडीतील पोषक आहार पुर्व प्राथमिक शिक्षण याविषयी बालविकास प्रकल्प अधिकारी अल्लडवाड, रिता चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी सर्व सेविका व मदतनिस यांनी अधिक परिश्रम घेतले.कार्यक्रम आयोजित करण्यासाठी हिना कौसर, अल्ताफ पठाण,सुमन फुले, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस विद्या अंकुशराव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांनी सांभाळली शाळेची धुरा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये 'शिक्षक दिन' मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य आकार देणाऱ्या आणि ज्ञानाचा प्रकाश पसरवणाऱ्या शिक्षकांसाठी हा संपूर्ण दिवस समर्पित करण्यात आला होता कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे साहित्यिक प्रा.शिवाजी शिंदे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे,प्राचार्या रश्मी कुंभार,, शाळेच्या समुपदेशिका डॉ.पद्मजा गांधी आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना प्राचार्यांनी शिक्षकी पेशाचे महत्त्व अधोरेखित केले. "शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवून त्यांना देशाचे सुजाण नागरिक बनवण्याचे कार्य करतात," असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. शिवाजी शिंदे सर यांनी आपल्या मनोगतात का शिकवावे,काय शिकवावे आणि कसे शिकवावे याविषयी मार्गदर्शन केले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे शाळेतील दहाविच्या वगार्तील विद्यार्थ्यांनी एका दिवसासाठी 'शिक्षक' बनून शाळेचा संपूर्ण कारभार सांभाळला. विद्यार्थ्यांनी प्राचार्य, पर्यवेक्षक आणि विविध विषयांचे शिक्षक बनून वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना शिकवण्याचा आनंद घेतला. अध्यापनाचा हा अनुभव घेताना विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला.

यापसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ.वर्षाताई विभुते यांनी सर्व शिक्षक वर्गाना शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. वर्षभर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भेटवस्तु देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन काजल कुलकर्णी यांनी केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे व्यवस्थापन, विद्यार्थी प्रतिनिधी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# इको फ्रेंडली बाप्पांसोबत मिळणार सीड बॉल!

## इको फ्रेंडली क्लबचा उपक्रम; पत्रकार भवनात मातीच्या गणेशमूर्तींचे प्रदर्शन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आपले सर्व सण–उत्सव पर्यावरणपूरक साजरे व्हावेत यासाठी प्रयत्नशील असलेल्या इको फ्रेंडली क्लबच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मातीच्या गणेशमूर्तीचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. सोलापूरच्या स्थानिक मूर्तिकारांनी बनवलेल्या या गणेशमूर्तीचे प्रदर्शन विजापूर रोडवरील पत्रकार भवन सभागृहात सुरू आहे. इको फ्रेंडली क्लबच्यावतीने मातीच्या गणेशमूर्तीसोबत सीड बॉल दिले जाणार आहेत.

इको फ्रेंडली क्लबच्यावतीने वर्षभर पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबवले जातात. गेल्या दहा वर्षापासून अधिक काळ इको फ्रेंडली क्लब आपले सर्व सण – उत्सव पर्यावरणपूरक साजरे व्हावेत यासाठी प्रयत्नशील आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा यासाठी सोलापूरचे मूर्तिकार विष्णू सगर, आशिष माशाळे आणि किरण सगर यांच्याकडून शाडू आणि लाल मातीच्या सुंदर इको फ्रेंडली गणेशमूर्ती बनवून घेतल्या आहेत. यात दगडूशेठ, लालबागचा राजा, चिंतामणी, शेठजी गणपती, लंबोदर यासह विविध प्रकारचे मॉडेल्स उपलब्ध आहेत.

प्लास्टर ऑफ पॅरिस म्हणजेच पीओपीपासून बनवलेल्या गणेशमूर्ती पाण्यामध्ये विरघळत नाहीत. पाणी प्रदूषित होते. जलचरांना धोका निर्माण झाला आहे. इको फ्रेंडली म्हणजेच मातीच्या गणेशमूर्ती तासाभरात विरघळतात, आपण या मूर्तीचे घरीच स्वच्छ पाण्यात विसर्जन करू शकतो. गेल्या दहा वर्षांपासून इको फ्रेंडली क्लबकडून इको फ्रेंडली गणेशमूर्तीचे प्रदर्शन भरवले जात आहे. यंदा विजापूर रोडवरील पत्रकार भवन सभागृहात इको फ्रेंडली गणेश मूर्तीचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. आजवर शेकडो पर्यावरणस्नेही सोलापूरकरांनी मातीच्या गणेशमूर्तीची नोंदणी केली आहे.

मातीच्या गणेशमूर्तीसोबत सर्वांना सीड बॉल म्हणजे बीज गोळे दिले जाणार आहेत. हे सीड विविध फळांच्या बियांपासून बनवले आहेत. या माध्यमातून सोलापूर परिसरात झाडांची संख्या वाढावी हा इको फ्रेंडली क्लबचा प्रयत्न आहे. सोलापूरकरांनी इको फ्रेंडली बाप्पाच्या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन अजित कोकणे यांनी केले आहे.

> पीओपीच्या गणेशमूर्ती पाण्यात विरघळत नाहीत, यामुळे नदी, तलाव, विहिरी प्रदूषित होत आहेत. पर्यावरण संवर्धनाचा विचार करून सर्वांनी इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करायला हवा. गणेशोत्सवानंतर आपण या गणेशमूर्तीचे घरीच स्वच्छ पाण्यात विसर्जन करू शकतो. इको फ्रेंडली बाप्पा प्रदर्शनामध्ये मातीच्या गणेशमूर्तीच्या भरपूर व्हरायटी उपलब्ध आहेत. सोलापूरकरांनी भेट द्यावी.
>
> – **शिवानी राठोड,**पर्यावरणस्नेही सोलापूरकर

> जलस्त्रोत प्रदूषित होत आहेत, त्यामुळे आपले सण–उत्सव पर्यावरणपूरकच साजरे केले पाहिजे. आपला बाप्पा मातीचा असावा आणि विसर्जन घरीच स्वच्छ पाण्यात करावे. इको फ्रेंडली बाप्पाचा उपक्रम खरंच स्वागत करण्यासारखा आहे. महत्त्वाचे म्हणजे या मूर्ती स्थानिक मूर्तिकारांनी बनवलेल्या आहेत. आम्ही अनेक वर्षापासून या विचाराला प्रोत्साहन देत आहोत.
>
> – **गजानन समुद्र,** पर्यावरणस्नेही सोलापूरकर

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ करावे - मल्लिकार्जुन मसुती

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात संवाद संपत चालला आहे, पूर्वी सनदशीर मार्गाने चर्चा करून मागण्या मान्य करून घेण्याची पद्धत होती. आता मात्र आंदोलन, मोर्चे, संप, उपोषण, हरताळ मारहाण आदी मार्ग स्वीकारले जात आहेत अशा स्थितीत विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवा प्रगल्भ करण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, नैतिक मूल्ये शिक्षकांनी रूजवावीत असे प्रतिपादन मल्लिकार्जुन मसुती यांनी व्यक्त केले.



**शिक्षक चुकला तर समाजाची अधोगती**

शिक्षक ज्ञानी असतो तो विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतो, त्यामुळे तो समाजाचा मार्गदर्शक मानला जातो, शिक्षक चुकला तर संपूर्ण पिढी बरबाद होते, समाज अधोगतीला जातो, हा डॉ राधाकृष्णन यांच्या विचाराचा मूलभूत संदेश आहे असे प्रा सौरभ भस्मे यांनी मार्गदर्शन करताना अधोरेखित केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा सौरभ भस्मे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मोबाईल, इंटरनेट, व्हाट्सअप, ट्विटर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थ्यांवरील संस्कार लुप्त होत आहेत, त्यामुळे सामाजिक स्थिती बिकट झाली आहे.

ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर शिक्षकांनी महत्त्वाची भूमिका घेतली पाहिजे.

मलकप्पा भरमशेट्टी म्हणाले की,'चांगला शिक्षक विद्यार्थ्याला केवळ शिकवत नाही, तर त्याला घडवतो.' शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा सदैव आदर केला पाहिजे.

प्रारंभी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले.

# विशेष मतदार यादी पुनरिक्षणासाठी विभागीय आयुक्तांच्या दौऱ्यांचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार पुणे महसूल विभागातील पाच जिल्ह्यांसाठी विभागीय आयुक्त शीतल तेली– उगले यांची ह्यमतदार यादी निरीक्षकह्व म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष सखोल पुनरिक्षण 2026 अंतर्गत दावे व हरकती स्वीकारण्याच्या टप्प्यात मतदार यादी निरीक्षक श्रीमती तेली–उगले यांचे 8 सप्टेंबर रोजी सोलापूर जिल्ह्यात येत असून त्यांचा दौरा तपशील पुढील प्रमाणे राहील.

मंगळवार दि. 8 सप्टेंबर 2026 रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी 6.30 वाजता पुण्याहून सोलापूरकडे प्रयाण करून ते शासकीय विश्रामगृह येथे येणार. सकाळी 10.45 ते 11.30 या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे विद्यमान खासदार, आमदार आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक होणार आहे. त्यानंतर 11.30 ते 12.00 या वेळेत जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे एफ्ड कार्यालय – 248 सोलापूर शहर उत्तर, 249 सोलापूर शहर मध्य आणि 251 सोलापूर शहर दक्षिण कार्यालयांची एकत्रित पाहणी केली जाणार आहे. दुपारी 12.00 ते 12.30 दरम्यान सिद्धेश्वर हायस्कूल / सोशल हायस्कूल येथे 249–सोलापूर शहर मध्य मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. 20 ते 22 आणि 8, 17 ते 19 ची पाहणी करून बीएलओ व मतदारांशी चर्चा केली जाईल. त्यानंतर 12.30 ते 12.50 या वेळेत शरदचंद्र पवार प्रशाला / लोकमंगल प्रशाला येथे 248–सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. 111 ते 133 ची पाहणी होईल.

दुपारी 12.50 ते 01.15 या वेळेत बसवेश्वर नगर / देगाव गावठाण येथे 252–सोलापूर दक्षिण मतदारसंघातील मतदान केंद्र क्र. 140 ते 150 ची पाहणी व बीएलओ, मतदारांशी संवाद साधला जाणार आहे. पाहणी दौरा आटोपल्यानंतर दुपारी 1.15 वाजता देगाव (सोलापूर) येथून सांगली जिल्ह्याकडे प्रयाण करतील.